नमुना-३

# खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याबाबत जाहीर नोटिस

उपविभागीय अधिकारी, चांदूर रेल्वे यांचे कार्यालय,
पत्ता :- चांदूर रेल्वे,
दिनांक :- १८/०९ /२०१९

**क्रमांक** :- स.ख.प्र.क्र. ०१/४७/२०१८-१९ मौजा - पहुर ज्या अर्थी, कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प व जलसंपत्ती अन्वेषण विभाग, अमरावती (जलसंपदा विभाग) चांदी नदी प्रकल्पाचे धरणाचे बांधकाम या सार्वजनक प्रयोजनाकरीता शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण -०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२, दिनांक १२ मे, २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ मधील तरतुदीस अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने जलसंपदा विभागा तर्फे कार्यकारी अभियंता यांचे नावे घेण्याबाबत प्रस्ताव जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्या अर्थी, जिल्हाधिकारी, अमरावती यांचे आदेश क्रमांक अ.का./प्र.अ. /भूसंपादन/ का. वि ४३९/२०१९ जिल्हाधिकारी कार्यालय दिनांक ११/०७/२०१९ अन्वये उक्त प्रस्तावा संबंधी उक्त शासन निर्णय दिनांक १२ मे, २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ आणि तदनुषंगिक शासन निर्णय, तसेच शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. एलक्यूएन-०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२,दिनांक २५ जानेवारी, २०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्या अर्थी, आता

१. उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार, मी श्री राजेन्द्र इंगळे , प्रभारी उपविभागीय अधिकारी, चांदूर रेल्वे याद्वारे,
   - (एक) अनुसूची - एक मध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने जलसंपदा विभागातर्फे कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प व जलसंपत्ती अन्वेषण विभाग, अमरावती, यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे.आणि
   - (दोन) प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी घेतांना जिल्हास्तरिय समितीमार्फत भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या व शेड्युल -१ च्या तरतुदीनुसार संबंधीत जमिनीसाठी परीगणीत होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रकमेवर २५% रक्कम वाढीव देवुन, मोबदला निश्चित करण्यात येईल,
   - (तिन) संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे जलसंपदा विभागातर्फे कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प व जलसंपत्ती अन्वेषण विभाग, अमरावती यांचे नावे खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णत: व अंतिमरीत्या स्वीकारण्यास तयार असल्याबाबतची संमतीपत्र (विकल्प) मागवीत आहे.

२. संबंधीत भूधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमतीपत्रे (विकल्प) सहा.कार्यकारी अभियंता / कार्यकारी अभियंता पाटबंधारे प्रकल्प व जलसंपत्ती अन्वेषण विभाग, अमरावती यांचेकडे दाखल करावीत.

३. संमतीपत्राचा (विकल्प) विहित नमुना उपविभागीय अधिकारी, चांदूर रेल्वे / कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प व जलसंपत्ती अन्वेषण विभाग, अमरावती यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमुना या कार्यालयामार्फत / जलसंपदा विभागाच्या प्राधिकृत अधिकाऱ्यामार्फत भुधारकांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

४. सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखड्याची प्रत उपविभागीय अधिकारी चांदुर रेल्वे, यांच्या कार्यालयामध्ये / कार्यकारी अभियंता पाटबंधारे प्रकल्प व जलसंपत्ती अन्वेषण विभाग, (जेल

रोड)अमरावती ४४४६०३ प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या कार्यालयिन वेळेत भुधारकांना किंवा हितसंबंधीत व्यक्तींना तसेच जनतेस निरिक्षाणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

अनुसूची — तीन
खरेदी द्यावयाच्या जमिनीचा तपशिल
जिल्हा :- अमरावती.

| अ.क्र. | तालुका | गावाचे नाव | भूमापन क्र. /गट नं. | सरळ खरेदी करावयाचे क्षेत्र हे.आर. |
|---|---|---|---|---|
| १ | नांदगाव (खंडे) | पहुर | ५९/२/२ पैकी | ०.१० |
| २ | नांदगाव (खंडे) | पहुर | ५७/१/क पैकी | ०.२६ |
| ३ | नांदगाव (खंडे) | पहुर | ५७/१/ड पैकी | ०.१८ |
| ४ | नांदगाव (खंडे) | पहुर | ३९/२ पैकी | ०.१४ |
| | | एकुण | | ०.६८ |

दिनांक :- १८/०९/२०१९
ठिकाण :- चांदुर रेल्वे

उपविभागीय अधिकारी तथा
भूसंपादन अधिकारी,
चांदुर रेल्वे